MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

वर्ष : १२ अंक : ६ पाने : १२ ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१८
E-Magazine visit us on : www.mahatransco.in

*प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,*

आपल्या सर्वांना नवीन वर्षाच्या मन:पूर्वक शुभेच्छा. आपणा सर्वांना चांगले आरोग्य, मनशांती आणि आनंद लाभो. उत्साही, आनंदी आणि कार्यमग्न राहिले की या गोष्टी आपोआप मिळतात, असा अनुभव आपल्याला आलाच असेल. जो वर्तमानात सर्व काळजी घेतो, त्याला भविष्याची काळजी करावी लागत नाही. याचा अर्थ आपले वर्तमानच भविष्य घडवत असते.

चालू वित्तीय वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत आपण आता आहोत. या वर्षाच्या कामगिरीचे ध्येय गाठण्याकरिता आणखी दोन महिने आपल्या हातात आहेत. मला आशा आहे की, सर्व मुख्य अभियंता व विभागप्रमुख आपल्या विभागाकरिता दिलेल्या

- *विजेच्या मागणीमध्ये मोठी वाढ*
- *प्रलंबित कामे मार्गी लावावीत*
- *वीजयंत्रणेच्या सक्षमीकरणावर भर*
- *पारेषण प्रणालीत सुधारणेची गरज*

कामगिरीचे लक्ष्य गाठण्याकरिता क्रियाशील असतील व सुनिश्चित करतील की ते ठरलेल्या कालावधीत पूर्णत्वाला नेतील.

हे दोन महिने वित्तीय वर्ष २०१९-२०२० च्या नियोजनाकरिताही अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतात. नियोजनाची संपूर्ण प्रक्रिया या दोन महिन्यात पार पाडणे महत्त्वाची असते. जेणेकरून, लागलीच एप्रिल महिन्यापासून नियोजनानुसार कृती करणे शक्य होते. अन्यथा नववर्षात नियोजन करून त्याची कृती विलंबाने सुरु होते व त्याचा दुष्परिणाम कृतीवर होऊ शकतो.

गेल्या वर्षातील कार्याचा आढावा घेतला असता असे दिसते की, गेल्या वर्षी विजेच्या मागणीमध्ये मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे महापारेषण कंपनीपुढे आपल्या पारेषण प्रणालीच्या वाढीसंदर्भात मोठे आव्हान आहे. अशा वेळी आपल्या प्रस्थापित पारेषण प्रणालीत सुधारणा करण्याची गरज आहे. त्यासाठी अनेक प्रलंबित कामे मार्गी लावणे गरजेचे आहे. वीजयंत्रणा आणि प्रणालीचे सक्षमीकरण करणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी राज्य पारेषण उपक्रम, अभिकल्प, कंत्राटे व अनुश्रावक, संचलन व सुव्यवस्था, चाचणी, स्वयंचलन आणि संचार विभाग, मानव संसाधन, वित्त, राज्य भार प्रेषण केंद्र, स्थापत्य, ईआरपी, सुरक्षा, कंपनी सचिव, दक्षता, विधी या विभागांनी आपल्या कार्यप्रणालीमध्ये आणखी सुधारणा करणे गरजेचे असून सातत्याने कार्यक्षमता वाढविण्याच्या अनुषंगाने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

प्रकल्प लांबणीवर गेल्यास त्याचा दूरगामी परिणाम संघटनेच्या कार्यकुशलतेवर पडत असतो. वेळ व पैसे अधिकचे लावावे लागतातच, पण त्यामुळे प्रणालीचा पूर्णतम वापर होण्यास बाधा निर्माण होते. संचलन व सुव्यवस्थेमध्येही वेळापत्रकानुसार सुव्यवस्थेची कामे पार पाडणे महत्त्वाचे असते. नाहीतर प्रणालीची संवेदनशीलता वाढू शकते. पारेषण प्रणाली मजबूत, भक्कम व अविरत ठेवणे आपल्या सर्वांची जबाबदारी आहे व त्यामध्ये कोणतीही उणीव आपण ठेवणार नाहीत, याचा मला विश्वास आहे.

कंपनीच्या सर्वांगीण विकासासाठी नवनवीन उपक्रमांना व्यवस्थापन नेहमीच प्रोत्साहन देत असते. त्याच अनुषंगाने महापारेषणने ऊर्जा क्षेत्रातील नवनवीन संधी शोधण्याकरिता व्यवसाय सुधारणा कक्ष (BDC) सुरु केला आहे. याव्दारे महापारेषणला तसेच आपल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या ज्ञान आणि कुशलतेचे देश व आंतरराष्ट्रीय पातळीवर योगदान देण्याची संधी प्राप्त होणार आहे. या संदर्भात अभियंता वर्गासाठी अंतर्गत अधिसूचना जाहीर करण्यात आली आहे. दि. ३१.०१.२०१९ पर्यंत इच्छुक अभियंत्यांनी आपला सहभाग cgmhr@mahatransco.in वर नोंदवावा, अशी विनंती करण्यात आली आहे. ही अधिसूचना कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

सुयोग्य व्यवस्थापनाकरिता कोणतेही काम हे वेळ व कामाचे विभाजन या दोन घटकांत मोजणे गरजेचे ठरते. त्याकरिता सातत्याने दूरचित्रवाणी परिषदेव्दारे (Video Conferencing) आढावा घेतला जात आहे. कामाचे सुयोग्य व्यवस्थापन परिमंडळ, मंडळ तसेच उपमंडळ अशा विविध पातळीवर सुक्ष्मपणे होणे गरजेचे आहे. त्याकरिता आपल्या कर्मचाऱ्यांच्या अनुभव व अंमलबजावणी क्षमतेचा चांगला उपयोग



**पराग जैन नानोटिया** (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

करून घेणे गरजेचे ठरते. सांघिक कार्यालय हे महापारेषणचा अविभाज्य आणि अतिमहत्त्वाचा भाग आहे. काम आणि कामांचे अनुकरण याबाबत या कार्यालयाने उत्तम उदाहरण घालून दिले पाहिजे. हे कार्यालय मानकीकरण व सुस्पष्ट मार्गदर्शक तसेच कार्यासंदर्भातील नामांकने क्षेत्रीय कार्यालयाकरिता तयार करते. उत्पादकता व परिणाम, वेळेवर प्रस्तावांची मंजुरी यामध्ये प्रत्येकांची भूमिका महत्त्वाची आहे. ही भूमिका प्रत्येकाने तत्परतेने पार पाडून संघटनेच्या कुशलता आणि सक्षमीकरणाकरिता आपले योगदान देणे गरजेचे ठरते.

संघटनात्मक यशाकरिता अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे सकारात्मकता, नवनवीन गोष्टी शिकण्याची आस व निरंतर सुधारणेसाठी प्रयत्न. या तिन्ही गोष्टी आपल्या कंपनीच्या यशस्वी वाटचालीसाठी गरजेच्या असून त्यांचा अंतर्भाव करण्याचा प्रयत्न आपले कर्मचारी बंधू आणि भगिनी करतील, असा मला विश्वास आहे. मला खात्री आहे की, प्रत्येक कर्मचारी आपल्या कामाप्रती नितांत तत्परता आणि निष्ठा राखून कंपनीला यशाच्या शिखरावर घेऊन जाण्यात मोलाचे योगदान देतील. पुन्हा एकदा सर्वांना नववर्षाच्या खूप शुभेच्छा आणि आपली स्वप्ने साकार होवोत, हीच सदिच्छा.

**शुभेच्छांसह..!**

**- पराग जैन नानोटिया**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक




**मंत्रालय :** ऊर्जा विभागाच्या तीन महत्त्वकांक्षी योजनेचा शुभारंभ करताना मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री श्री. चंद्रकात पाटील, ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, अन्न व नागरी पुरवठामंत्री श्री. गिरीष बापट, गृहनिर्माणमंत्री श्री. प्रकाश मेहता, सहकारमंत्री श्री. सुभाष देशमुख, आदिवासी विकासमंत्री श्री. विष्णू सावरा, जलसंपदामंत्री श्री. गिरीष महाजन, पर्यटनमंत्री श्री. जयकुमार रावल, राज्यमंत्री सर्वश्री प्रवीण पोटे-पाटील, दीपक केसरकर, विजय शिवतारे.

## ■ ऊर्जा विभागाच्या तीन योजनांचा शुभारंभ ■

# राज्यातील शेतकऱ्यांना मोठा लाभ : मुख्यमंत्री

■ *टीम महापारेषण/टीम महावितरण, मुंबई*

ऊर्जा विभागाने लोकहिताच्या व लोकाभिमुख अशा महत्त्वकांक्षी तीन योजना सुरू केल्या आहेत; याचा लाभ राज्यातील शेतकऱ्यांना व जनतेला मोठ्या प्रमाणात होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे व्यक्त केला.

ऊर्जा विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत उभारण्यात आलेले सौर ऊर्जा प्रकल्प, विद्युत वाहन चार्जिंग स्टेशन्स व शेतकऱ्यांच्या कृषीपंपाला नवीन वीज जोडणी देण्याकरिता उच्चदाब वितरण प्रणाली (एचव्हीडीएस) या तीन अभिनव योजनांचा शुभारंभ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मंत्रालयात करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास महसूलमंत्री श्री. चंद्रकात पाटील, ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, अन्न व नागरी पुरवठामंत्री श्री. गिरीष बापट, गृहनिर्माणमंत्री श्री. प्रकाश मेहता, आदिवासी विकासमंत्री श्री. विष्णू सावरा, जलसंपदामंत्री श्री. गिरीष महाजन, पर्यटनमंत्री श्री. जयकुमार रावल, राज्यमंत्री सर्वश्री प्रवीण पोटे-पाटील, दीपक केसरकर, विजय शिवतारे, मुख्य सचिव दिनेशकुमार जैन, मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव प्रवीण परदेशी व इतर मान्यवर उपस्थित होते.

## मागेल त्याला मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी : ऊर्जामंत्री

*प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या अभिनव अशा योजनेचे उद्घाटन संपन्न होताना आनंद व अभिमान वाटत आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे जीवन परिवर्तन झाले पाहिजे हा ध्यास घेऊन ऊर्जा विभाग आपल्या योजना राबवित आहे. नीती आयोगाने कौतुक केलेली मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी ही योजना असून अशा प्रकारची ही देशातील पहिली योजना आहे. राज्यातील जो शेतकरी बांधव ही योजना मागेल त्याला दिली जाईल, असे ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी या वेळी सांगितले.*


ऊर्जा विभागाचे गेल्या चार वर्षात चांगले कार्य सुरु असून शेतकऱ्यांच्या हितासाठी, सर्वसामान्यांना उपयुक्त असे निर्णय विभागामार्फत घेतले जात आहेत. या तीनही योजना या महत्त्वपूर्ण असून पर्यावरणपूरक आहेत. या सर्व योजनांमुळे येत्या काही दिवसात शेतकरी बांधवांना दिवसा वीज देणे शक्य होईल असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

विद्युत वाहन चार्जिंग स्टेशनमुळे पर्यावरणाचा ऱ्हास निश्चितच वाचेल, तसेच इंधनाचा भार देखील कमी होईल. मोटरवाहन निर्मिती करणाऱ्या कंपन्या इलेक्ट्रिकल वाहन तयार करीत आहेत. त्यामुळे विद्युत वाहन चार्जिंग स्टेशनला चांगली मागणी आहे. राज्यातील विद्युत अभियंता, पदविकाधारक तसेच आयटीआयच्या युवकांना ही विद्युत स्टेशन देण्याबाबतचा निर्णय देखील महत्त्वाचा आहे. रोजगाराची मोठी संधी यातून मिळणार आहे. देशातील कोणत्याही राज्यापेक्षा अधिक विद्युत निर्माण करण्याची क्षमता असलेले आपले राज्य आहे, असे सांगून त्यांनी ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे व त्यांच्या टीमचे अभिनंदन केले.

ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री. अरविंद सिंह व महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. संजीव कुमार यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. आपल्या प्रास्ताविकातून श्री. संजीव कुमार यांनी या तीनही अभिनव योजनांची सविस्तर माहिती दिली. तद्नंतर मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या योजनांचा रिमोटद्वारे शुभारंभ करण्यात आला.

■ राज्यात पारेषण व वितरण यंत्रणेचे आधुनिकीकरण ■

# राज्यात २४,९६२ मेगावॅट विजेच्या मागणीचा विक्रम



■ टीम महापारेषण/टीम महावितरण, मुंबई

ऑक्टोबर हिटच्या तडाख्यामुळे राज्यात विजेच्या मागणीने विक्रमी उच्चांक गाठला आहे. २२ ऑक्टोबर २०१८ रोजी तब्बल २४,९६२ मेगावॅट ही सर्वाधिक विजेची मागणी नोंदविण्यात आली. यामध्ये मुंबई वगळता उर्वरित राज्यात म्हणजे महावितरणच्या कार्यक्षेत्रात २१,५८० मेगावॅट तर मुंबईमध्ये ३३८२ मेगावॅट विजेची मागणी होती.

सध्या ऑक्टोबर हिटच्या झळांनी विजेच्या मागणीत सातत्याने वाढ होत आहे. उन्हाळ्यातील मागणीपेक्षाही ऑक्टोबर महिन्यात विजेची अधिक मागणी नोंदविण्यात येत आहे. राज्यात १६ ऑक्टोबर २०१८ रोजी २४,९२२ मेगावॅट तर महावितरणकडे २१,५४२ मेगावॅट, १७ ऑक्टोबरला २४,६८७ मेगावॅट तर महावितरणकडे २१,२२३ मेगावॅट विजेची मागणी होती. त्यानंतर २२ ऑक्टोबरला ही मागणी २४,९६२ मेगावॅटवर गेली. आजवरची ही उच्चांकी मागणी आहे. याच दिवशी मुंबई वगळता उर्वरित महाराष्ट्रात २१,५८० मेगावॅट विजेची मागणी होती.

एकदम विजेची मागणी वाढल्यामुळे योग्य नियोजनाद्वारे महावितरणकडून २०,६३० मेगावॅट विजेचा पुरवठा करण्यात आला. राज्यात ज्या वाहिन्यांवर सर्वाधिक वीजहानी आहे, वीजदेयकांची वसुली अत्यंक कमी आहे अशा जी-१ ते जी-३ गटातील वाहिन्यांवर ९५० मेगावॅट विजेचे भारनियमन करण्यात आले.

राज्यात वितरण व पारेषण यंत्रणेचे गेल्या तीन वर्षांपासून विविध योजनांच्या माध्यमातून सक्षमीकरण व आधुनिकीकरण करण्यात येत आहे. कोणत्याही तांत्रिक बिघाडाशिवाय 'महावितरण'ने २०,६३० मेगावॅट विजेचा पुरवठा केला तर 'महापारेषण'ने २४,०१२ मेगावॅट वीज पारेषित केली.



# मराविमं सूत्रधारी कंपनीच्या संचालकपदी श्रीमती नीता केळकर

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या सूत्रधार कंपनीत स्वतंत्र संचालक म्हणून श्रीमती नीता केळकर यांची नेमणूक करण्यात आली. संचालक मंडळाच्या बैठकीत ही नियुक्ती करण्यात आली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे होते.

श्रीमती केळकर मूळच्या सांगलीच्या रहिवासी असून सिव्हील इंजिनियर आहेत. तसेच महिलांसाठी विविध सामाजिक उपक्रमातसुध्दा त्यांचा पुढाकार असतो. श्रीमती केळकर यांच्या स्वतंत्र संचालक म्हणून केलेल्या नियुक्तीने मराविमं सूत्रधारी कंपनीत असलेली स्वतंत्र संचालकाची रिक्त जागा पूर्ण झाली आहे.

संचालकांच्या बैठकीला ऊर्जा राज्यमंत्री श्री. मदन येरावर, ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री. अरविंद सिंह, `महावितरण`चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजीव कुमार, `महापारेषण`चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया, `महावितरण`चे संचालक (वित्त) श्री. सुनील पिंपळखुटे, होल्डिंग कंपनीचे स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक, श्री. प्रकाश पागे व श्री. राजेंद्र गोयंका उपस्थित होते.





**प्रकाशगंगा इमारत, मुंबई :** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीमध्ये (महापारेषण) दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात आला. याप्रसंगी शपथ घेताना श्री. रवींद्र चव्हाण, श्री. गणपत मुंडे, श्री. विनायक साठे, श्री. सुगत गमरे, श्री. श्रीकांत राजूरकर, श्रीमती ज्योती चिमटे, श्री. संजयकुमार, श्री. सुधीर वानखेडे, श्री. राजू गायकवाड यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचारी.

■ भ्रष्टाचार निर्मुलनाची घेतली प्रतिज्ञा ■

# `महापारेषण`मध्ये दक्षता जनजागृती सप्ताह साजरा


■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या महाराष्ट्रातील विविध कार्यालये, उपकेंद्रे व भांडारे यामध्ये दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात आला. केंद्रीय दक्षता आयोग आणि राज्य शासनाच्या निर्देशानुसार दि. २९ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०१८ या कालावधीत हा सप्ताह आयोजित करण्यात आला होता.

यानिमित्ताने सांघिक कार्यालयामध्ये भ्रष्टाचार निर्मुलनाची प्रतिज्ञा घेण्यात आली. सुरूवातीला कार्यकारी अभियंता (दक्षता) श्रीमती वर्षा शिंदे यांनी उपस्थितांना प्रतिज्ञा दिल्यानंतर मा. राज्यपाल व मा. मुख्यमंत्री यांचा या सप्ताहानिमित्त दिलेला संदेश वाचून दाखविण्यात आला. प्रकाशगंगा इमारतीमध्ये विविध ठिकाणी भित्तीपत्रके, बॅनर्स, पोस्टर्स आणि घोषवाक्ये लावण्यात आली होती.

CENTRAL VIGILANCE COMMISSION

याप्रसंगी संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण, संचालक (संचलन) श्री. गणपत मुंडे, संचालक (वित्त) श्री. विनायक साठे, कार्यकारी संचालक (मानव संसाधन) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, मुख्य तपास अधिकारी श्री. श्रीकांत राजूरकर, मुख्य अभियंता (अभिकल्प) श्री. श्रीराम भोपळे, मुख्य अभियंता (प्रकल्प योजना) (प्रभारी) श्रीमती ज्योती चिमटे, मुख्य सुरक्षा अधिकारी श्री. संजयकुमार, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मा.सं, आस्थापना) श्री. राजू गायकवाड यांच्यासह विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या सप्ताहाचे नियोजन करण्यासाठी मुख्य तपास अधिकारी श्री. श्रीकांत राजूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्य तपास अधिकारी श्री. बी.एम.पाटील यांचा सक्रिय सहभाग होता.



**महापारेषणची उद्दिष्टे**

पारेषण जाळ्यांचा विकास करणे



## ■ ५४ वा स्कॉच पुरस्कार ■

# उत्कृष्ट क्षमताबांधणीबद्दल महापारेषणला पुरस्कार

■ *टीम महापारेषण, मुंबई*

नवी दिल्ली येथे झालेल्या ५४ व्या स्कॉच पुरस्कारामध्ये क्षमता बांधणी आणि प्रशिक्षण कार्यक्रम या गटात उत्कृष्ट कार्याबद्दल महापारेषणला पुरस्कार देण्यात आला. महापारेषणच्या वतीने कार्यकारी संचालक (प्रभारी) श्री. सुगत गमरे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

स्कॉच ग्रुपच्या वतीने दरवर्षी शासन, अर्थ, बँकिंग, तंत्रज्ञान, सांघिक नागरिकत्व, आर्थिक या क्षेत्रातील वाढीसाठी हा पुरस्कार दिला जातो. महापारेषणच्या मानव संसाधन विभागाने नॉमिनेशन भरून सदर पुरस्कार गुणांकन पद्धतीने मिळविला आहे. याप्रसंगी स्कॉच ग्रुपच्या तज्ज्ञांसमोर महापारेषणचे कार्यकारी संचालक (प्रभारी) श्री. सुगत गमरे यांनी महापारेषणच्या उत्कृष्ट मूल्यांकनाचे सादरीकरण केले. यावेळी महाव्यवस्थापक (मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे, अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) (प्रभारी) श्री. योगेश पाचपांडे उपस्थित होते.



**नवी दिल्ली :** ५४ व्या स्कॉच पुरस्कारामध्ये पुरस्कार स्वीकारताना महापारेषणचे कार्यकारी संचालक (प्रभारी) श्री. सुगत गमरे, शेजारी महाव्यवस्थापक (मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे, अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) (प्रभारी) श्री. योगेश पाचपांडे.

# महापारेषण कंपनीतर्फे Innovations @MSETCL

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

■ *टीम महापारेषण, सांघिक कार्यालय*

महापारेषणच्या वतीने अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी नवकल्पनांना वाव देण्यासाठी Innovations @MSETCL हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे.

कर्मचारी संघाच्या नावीन्यपूर्ण कल्पनांना वाव मिळावा तसेच कंपनीमध्ये सातत्यपूर्ण सुधारणा घडवून आणण्यासाठी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यासाठी महापारेषणमध्ये नावीण्यता उपक्रम हे परिपत्रक मा.सं.५२ दि.१.९.२०१८ अन्वये जारी करण्यात आले आहे.

सदर उपक्रमाकरिता आपल्या सूचना व प्रस्ताव innovations@mahatransco.in या ई-मेलवर पाठवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.



## *महापारेषणची उद्दिष्टे*

सर्वोत्कृष्ट प्रणालीचा अभ्यास व नियोजनविषयक क्षमतांचा विकास घडवून आणणे



■ कंपनीच्या कामाचा आढावा ■

# `महापारेषण`चे प्रकाशपर्व पुस्तक ऊर्जामंत्र्यांना भेट

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्यूत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) कामकाजाचा आढावा घेणारे `प्रकाशपर्व` हे पुस्तक `महापारेषण`चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया यांनी ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांना भेट दिले.

या पुस्तकामध्ये मा. मंत्रिमहोदय, ऊर्जा विभाग यांच्या चार वर्षातील कारकिर्दीतील (नोव्हेंबर २०१४ ते ऑगस्ट २०१८ पर्यंत) धोरण, निर्णय व केलेले विकासाचे, लोकहिताचे कार्य तसेच महत्त्वाच्या कामांची/उपक्रमांची माहिती देण्यात आली आहे.

या वेळी `महावितरण`चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजीवकुमार, म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक, `महापारेषण`चे संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण, `महापारेषण`चे कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.



**मुंबई :** `महापारेषण`च्या कामकाजाचा आढावा घेणारे `प्रकाशपर्व` पुस्तक ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांना देताना `महापारेषण`चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया, शेजारी `महावितरण`चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजीवकुमार, म. रा. वि. मं. सूत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक, कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे व अन्य अधिकारी.

■ संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन ■

# `महापारेषण`मध्ये संविधान दिवस साजरा

## लोकशाहीचा जागर, संविधानाचा आदर



**मुंबई :** महापारेषणमध्ये भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करताना वरिष्ठ अधिकारी.

■ *टीम महापारेषण, सांघिक कार्यालय*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीमध्ये (महापारेषण) भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून संविधान दिवस साजरा करण्यात आला.

सुरवातीला महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया यांच्या उपस्थितीत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. यावेळी संचालक (संचलन) सर्वश्री गणपत मुंडे, संचालक (वित्त) विनायक साठे, कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मा. सं.मनुष्यबळ नियोजन) सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) राजू गायकवाड, मुख्य अभियंता शशांक जेवळीकर, श्रीराम भोपळे, मुख्य विधी सल्लागार शिवाजीराव पाटील, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी अनंत पाटील यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### *महापारेषणची उद्दिष्टे*

कामाची नीतिमूल्ये, गुणवत्तेबाबत जागरुकता
कर्मचाऱ्यांच्या मनावर बिंबविणे



■ महामानवाचे विचार आचरणात आणा ■

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

सुरवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. ``डॉ.आंबेडकर यांनी मांडलेले विचार सर्वांनी आचरणात आणले तर खऱ्या अर्थाने त्यांना आदरांजली ठरेल.``, असे विचार मान्यवरांनी व्यक्त केले.

याप्रसंगी संचालक (प्रकल्प) सर्वश्री रवींद्र चव्हाण, संचालक (संचलन) गणपत मुंडे, कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) सुगत गमरे, कंपनी सचिव विनीता श्रीवाणी, मुख्य अभियंता श्रीकांत राजूरकर, आर.एल.गायकवाड, शशांक जेवळीकर, मोतीसिंह चौहान, मुख्य महाव्यवस्थापक (विवले) अनिल कालेकर, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (विवले) सुनीलदत्त शर्मा, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी अनंत पाटील, अधीक्षक अभियंता दीपक रोकडे, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे तांत्रिक सल्लागार सुनील सूर्यवंशी, अधीक्षक अभियंता जुईली वाघ, मुख्य विधी सल्लागार शिवाजीराव पाटील, शेखर सावळे यांचेसह अन्य अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार कार्यकारी अभियंता श्री. महेंद्र वाकळे यांनी मानले.



**प्रकाशगंगा इमारत, मुंबई :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त `महापारेषण`मध्ये सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

■ अनुयायांना मास्क वाटप ■

# डॉ. आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनी चैत्यभूमीवर मोफत पाणीवाटप



**चैत्यभूमी, मुंबई :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त चैत्यभूमीवर जमलेल्या अनुयायांना मोफत पाणी, नाश्ता वाटप करताना `महापारेषण`चे कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, श्री. राजू गायकवाड, श्री. सुधीर वानखेडे व अन्य अधिकारी.

■ *टीम महापारेषण, मुंबई*

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटना आणि महाराष्ट्र राज्य वरिष्ठ अभियंता व अधिकारी संघटना यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले. चैत्यभूमीवर जमलेल्या लाखो अनुयायांना मोफत पाणी, नाश्ता व मास्क वाटप करण्यात आले.

सुरवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस महापारेषणचे महाव्यवस्थापक (मा.सं. आस्थापना) श्री. राजू गायकवाड यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष श्री. संजय घोडके व महाराष्ट्र राज्य वरिष्ठ अभियंता व अधिकारी संघटनेचे श्री. गौतम कांबळे उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचे महापारेषण सांघिक कार्यालय अध्यक्ष श्री. जयंत कांबळे, सचिव श्रीमती रंजना खैरे, उपाध्यक्ष श्री. रवीकिरण जांब्रुणकर यांच्या नेतृत्वाखाली संघटनेच्या अन्य सदस्यांनी मोफत पाणी व मास्क वाटप उपक्रमाला सहकार्य केले.

■ पथनाट्याचे सादरीकरण ■

# महापारेषणमध्ये सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी



■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

यावेळी संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण, संचालक (संचलन) श्री. गणपत मुंडे, कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. अनिल कालेकर, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. संजय कुमार, महाव्यवस्थापक (मा.सं. मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) श्री. राजू गायकवाड, मुख्य अभियंता श्री. श्रीराम भोपळे, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे तांत्रिक सल्लागार श्री. सुनील सूर्यवंशी, मुख्य विधी सल्लागार श्री. शिवाजीराव पाटील यांचेसह विविध अधिकारी व महिला कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुरवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण व संचालक (संचलन) श्री. गणपत मुंडे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. श्री. रवींद्र चव्हाण व श्री. सुगत गमरे, श्रीमती बीना खोत, निशिगंधा बनकर, मनिषा सुपे, मंजुषा चौधरी यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याविषयी माहिती सांगितली.

सांघिक कार्यालयातील महिला कर्मचारी श्रीमती भारती कांबळे, मंजूषा चौधरी, दर्शना बंधरकर, वैशाली शिरसाट, प्रेमा कुरकुटे, सुषमा चोपडे, सीमा तांबे, प्रिया कुंभार यांनी ज्ञानाची ज्योती सावित्रीबाई हे पथनाट्य सादर केले. पथनाट्याचे लेखन श्रीमती भारती कांबळे व श्री. महेंद्र वाकळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार भारती कांबळे यांनी मानले.



**प्रकाशगंगा इमारत, मुंबई :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त पथनाट्य सादर करताना महापारेषणमधील अधिकारी व कर्मचारी महिला.



## *महापारेषणची उद्दिष्टे*

माहिती व ज्ञान व्यवस्थापन पद्धती व संचलन कौशल्य विकसित करणे



■ डॉ. चंद्रशेखर ताम्हाणे यांचे मार्गदर्शन ■

# औरंगाबाद परिमंडळातर्फे कर्करोग जागरुकतेसाठी कार्यक्रम

■ *टीम महापारेषण, औरंगाबाद*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या औरंगाबाद परिमंडळाच्या वतीने कर्करोग जागरुकता करण्यासाठी एका संवादाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी कर्करोगतज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर ताम्हाणे यांनी कर्करोग आजार, उपचार तसेच त्याबाबत घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. मुख्य अभियंता श्री. अविनाश कोंडावार व सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. चंद्रशेखर बोराडे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी औरंगाबाद परिमंडळाच्या महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



**औरंगाबाद :** 'महापारेषण'च्या औरंगाबाद परिमंडळातर्फे कर्करोग जागरुकता करण्यासाठी आयोजिलेल्या कार्यक्रमात बोलताना डॉ. चंद्रशेखर ताम्हाणे. शेजारी मुख्य अभियंता श्री. अविनाश कोंडावार व सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. चंद्रशेखर बोराडे.




**परभणी :** अउदा संवसु विभाग येथील उच्चस्तर लिपीक श्री. जयराम सोपान गीते यांनी महापारेषण कर्मचाऱ्यांतर्फे सार्वजनिक पाणपोई १३२ के.व्ही.परभणी उपकेंद्राच्या प्रवेशव्दारासमोर सुरु केली. याप्रसंगी कार्यकारी अभियंता श्री. डी. एस. शेंदुरवादकर, उपव्यवस्थापक (विवले) श्री. मनोहर कांबळे, उपकार्यकारी अभियंता श्री. जी.आर.टाक.



**पंढरपूर :** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीमध्ये दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात आला. याप्रसंगी पंढरपूर कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी.



## *महापारेषणची उद्दिष्टे*

विविध प्रकारची कामे करणाऱ्या गट व समूह
यांच्यात बंध तयार करणे



# अभियंत्यांसाठी प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रात शिबिर

■ *टीम महापारेषण, प्रशिक्षण*

महापारेषणच्या अभियंत्यांना राज्यस्तरावर विविध प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रात त्यांच्या दैनंदिन कामात सुसुत्रता होण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये तांत्रिक मुद्दे, आर्थिक बाबी, कर्मचाऱ्यांच्या देयके व इतर बाबी, सुरक्षा व दक्षता, कार्यालयीन पत्रव्यवहार व अन्य मुद्द्यांचा या शिबिरात समावेश करण्यात आला आहे. पडघे, बाभळेश्वर, जेजुरी, तळंदगे आणि वाळुज या उपकेंद्रावर प्रशिक्षण घेण्यात आले. प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी प्रशिक्षण केंद्रप्रमुख तथा अधीक्षक अभियंता सर्वश्री संदीप कलंत्री, दीपक पाटील (प्रभारी), जयंत कुलकर्णी, सुनील माने, श्यामकांत वसेकर, अतिरिक्त कार्यकारी अभियंता सर्वश्री नितीन झोपे, सुनीलदत्त कुलकर्णी, सुनील शेणवा, किशोर काटोरे यांनी परिश्रम घेतले.

दैनंदिन कामाच्या पद्धतीनुसार प्रकल्प, संचलन व सुव्यवस्थामधील best Practices या विषयांवर चार दिवसांच्या या प्रशिक्षणामध्ये प्रकल्प, संचलन व सुव्यवस्था, कार्यालयीन व्यवस्थापन व मानव संसाधनाच्या प्रश्नांविषयी महत्त्वाचे मुद्दे व त्यावर मार्गदर्शन तज्ज्ञ प्रशिक्षणाव्दारे देण्यात येणार आहे.




**वाळूज :** जि. औरंगाबाद येथील प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रात सहभागी झालेले प्रशिक्षणार्थी.

# चंद्रपूरमध्ये कर्मचाऱ्यांसाठी विविध प्रशिक्षण




**चंद्रपूर :** महापारेषणच्या तृतीय आणि चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांसाठी आयोजिलेल्या प्रशिक्षण शिबिरात उपस्थित असलेले अधिकारी व कर्मचारी.

■ *टीम महापारेषण, प्रशिक्षण*

चंद्रपूर येथील प्रशिक्षण केंद्रात तृतीय आणि चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी शक्ती, परिवर्तन, सर्वोत्तम असे विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आले. त्याचप्रमाणे SAP, वित्त, रोहित्र या विविध विषयांवर कार्यशाळा घेण्यात आल्या.

तसेच पंधरा दिवसीय औद्योगिक प्रशिक्षण वेगवेगळ्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षण उपक्रमात प्रशिक्षणार्थ्यांना विद्युत प्रणालीविषयी माहिती देण्यात आली. या प्रशिक्षणाच्या उदघाटन समारंभाला एच.व्ही.डी.सी. परिमंडल, चंद्रपूरचे अधीक्षक अभियंता श्री. संजय आत्राम, कार्यकारी अभियंता श्री. अविनाश वट्टी, श्री. सुनील सारडे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता तथा प्रशिक्षण समन्वयक श्री. उमेश शेंडे यांनी प्रशिक्षणार्थ्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या आणि पुढील आव्हाने याबद्दल मार्गदर्शन केले. प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी अधीक्षक अभियंता श्री. संजय आत्राम, श्री. पोतदार, श्री. पिल्लेवान उपस्थित होते.



## महापारेषणची उद्दिष्टे

संचलन व सेवा याबाबत सर्व वैधानिक नियंत्रित संकेत, मानके, निर्देश व ध्येये यांची पूर्तता



# पडघे येथे दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा

■ *टीम महापारेषण, प्रशिक्षण*

महापारेषण कंपनीच्या प्रशिक्षण धोरणांतर्गत `सर्वोत्तम' ही दोन दिवसांची प्रशिक्षण कार्यशाळा प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, पडघा येथे घेण्यात आली. प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी केंद्राचे प्रमुख व अधीक्षक अभियंता उ.दा. दि.धा.ग्र.कें. संवसु मंडल, पडघा श्री. संदीप कलंत्री तसेच सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) वाशी परिमंडल डॉ. शीतल गेडाम यांनी परिश्रम घेतले. कार्यशाळेच्या दुसऱ्या तुकडीच्या उदघाटन समारंभात महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे हे उपस्थित होते.

या कार्यशाळेमुळे कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन काम करण्याच्या क्षमतेमध्ये वाढ होईल आणि असे प्रशिक्षण ठराविक कालांतराने नियमितरित्या आयोजित करण्यात यावे, असे मनोगत कार्यशाळेच्या सांगता समारंभात प्रशिक्षणार्थ्यांनी व्यक्त केले.




**पडघे :** महापारेषणच्या प्रशिक्षण धोरणांतर्गत `सर्वोत्तम' या दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेप्रसंगी अधिकारी व कर्मचारी.



**महापारेषण**
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

महापारेषण कंपनी इतर राज्यांत तसेच परदेशात पारेषण प्रकल्प उभारणीची कामे हाती घेणार आहे. त्यासाठी पारेषण अभियंत्यांस अशा प्रकल्पात मोलाचे योगदान देण्याची संधी प्राप्त होणार आहे. त्यासाठी अधिसूचना कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्याकरिता अर्ज करण्याची अंतिम तारीख ३१.०१.२०१९ आहे. तरी इच्छूक अभियंत्यांनी संकेतस्थळावर दिलेली अधिसूचना कृपया पाहावी व त्यासाठी इच्छुक असल्यास आपला अर्ज दि. ३१.०१.२०१९ पर्यंत cgmhr@mahatransco.in या ई-मेलवर पाठवावा, ही विनंती.

-Team MSETCL



## *महापारेषणची उद्दिष्टे*

उपकेंद्राचा आराखडा, सुव्यवस्था आणि सुरक्षा, दुरुस्ती व संवर्धन करणे



# आदर्श व्यवस्थापन




एखादी संस्था किंवा कंपनीच्या कामकाजाचा विचार केला जातो तेव्हा व्यवस्थापन आणि कर्मचारी अशी चुकीची फोड करण्याची पद्धत रूढ झाली आहे. मुळात व्यवस्थापन आणि कर्मचारी हे वेगळे घटक नाहीत, ते एकच आहेत, हे आधी लक्षात घेतले पाहिजे. व्यवस्थापनात केवळ अधिकारी, केवळ कर्मचारी, इमारत, कार्यालय किंवा कार्यपद्धती अशा विशिष्टच गोष्टी येतात, हे आधी मनातून काढून टाकले पाहिजे. व्यवस्थापनात कंपनीशी संबंधित हे सर्वच घटक येतात. या सर्व घटकांत उत्तम समन्वय राहावा आणि कंपनीची उद्दिष्टे साध्य व्हावीत, याचे नियोजन करणारी व्यवस्था म्हणजे व्यवस्थापन असे म्हणता येईल. हे व्यवस्थापन केवळ कंपनीलाच लागते, असे नसून मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रात व्यवस्थापनाला अतिशय महत्त्व आहे. एवढेच नव्हे तर मानवी जीवनातील इतर क्षेत्र जशी हजारो वर्षापासून विकसित झाली आहेत, तसेच व्यवस्थापन शास्त्रही विकसित झाले आहे.

आधुनिक काळात व्यवस्थापनाला अधिक महत्त्व आले आहे, हे मात्र खरे आहे. पण त्याची तशीच काही कारणे आहेत. आजच्या मानवी समाजाच्या व्यवहारांकडे पाहिल्यास आपल्या असे लक्षात येईल की लोकसंख्या जसजशी वाढते आहे, तसतसा समाज अधिकाधिक संघटित होत चालला आहे. त्याचे कारण जगात नैसर्गिक संसाधने तुलनेने कमी आहेत आणि त्यांचा वापर करणारी लोकसंख्या अधिक आहे. त्यामुळे ही संसाधने चांगल्या पद्धतीने वापरली पाहिजेत. त्यांची नासाडी होता कामा नये. त्यांचे वितरण चांगले झाले पाहिजे. ज्याला आपण शाश्वत विकास म्हणतो, तो शाश्वत विकास साध्य करण्यासाठी व्यवस्थापन ही काळाची गरज आहे.

कोणतीही कंपनी चांगली तेव्हाच चालते जेव्हा तिचे व्यवस्थापन चांगले असते. आधुनिक जगात व्यवस्थापन अतिशय प्रगत झाले आहे, त्याचे कारण कंपनी देत असलेली सेवा, त्यासंबंधीचे अर्थशास्त्र, कंपनीला भेडसावणारी स्पर्धा, कंपनीला अंतिमत: गाठावी लागणारी उद्दिष्टे आणि कंपनी चालविताना लागणारा फायदा या सर्व बाबींना अतिशय महत्त्व आले आहे. यासाठी कंपनीचे उद्दिष्ट, उपलब्ध मनुष्यबळ, आर्थिक तरतूद, यंत्रसामुग्री किंवा तंत्रज्ञान या सर्व घटकांचा मेळ घालणे आवश्यक असते. हा मेळ घालायचा म्हणजे कंपनीचे व्यवस्थापन चांगले करणे होय. त्यामुळे व्यवस्थापन म्हणजे या सर्व गोष्टी, हे नेहमी लक्षात ठेवले पाहिजे. कंपनीतील प्रत्येकजण या व्यवस्थापनाचा भाग असतो, नव्हे तो जर तसा नसेल तर त्या कंपनीचे उद्दिष्ट खऱ्या अर्थाने साध्य होऊ शकत नाही.

आधुनिक काळात साधन सामग्रीचा योग्य वापर, वस्तुनिष्ठ निर्णय प्रक्रिया, साधन सामग्रीचे उत्पादित वस्तूमध्ये रुपांतर करणे, विकास प्रक्रिया गतिमान करणे, आर्थिक संकटांना तोंड देणे, साधन-सामग्रीचा दुरुपयोग टाळणे, कंपनीचे अर्थव्यवहार सांभाळून नफ्यात वाढ करत राहणे, कंपनीत काम करणाऱ्या मनुष्यबळातील संबंध चांगले ठेवणे, नव्या व्यवसाय संधी शोधणे याला अतिशय महत्व आले आहे. त्याचे कारण वाढत्या गरजा आणि तेवढीच वाढती स्पर्धा होय. ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी कंपनी असते आणि त्यात सतत सुधारणा आणि सातत्य ठेवावे लागते. एकप्रकारे हे मोठेच आव्हान असते. आदर्श व्यवस्थापन या सर्व आव्हानांचा सामना करतच पुढे जात असते.

कोणत्याही कंपनीच्या प्रतिमेला आधुनिक काळात अतिशय महत्व प्राप्त झाले आहे. याचे भान व्यवस्थापन म्हणून आपल्या सर्वांना ठेवावे लागणार आहे. त्यामुळे व्यवस्थापन म्हणजे तो आपला विषय नाही, असा समज करून न घेता आपण त्याचा अपरिहार्य असा भाग आहोत आणि असे मानणाऱ्या टीमवर्कने आदर्श अशा व्यवस्थापनाकडे आपल्याला जायचे आहे.

**– सुगत गमरे**

**कार्यकारी संचालक (मानव संसाधन) (प्रभारी)**

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by **PRO** for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts:** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.